Review Of Research
ISSN:-2249-894X
Impact Factor : 3.1402(UIF)
Vol. 4 | Issue. 4 | Jan. 2015
Available online at www.ror.isrj.org

# "महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा इतिहास"

**बाळासाहेब मरगजे**

मु.सा.काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता.बारामती, पुणे महाराष्ट्र,

***सरांश*** – हा पेपर लिहीण्याचा प्रमुख हेतू असा आहे की, महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषदेच्या मार्गदर्शनाखाली गेली ६० वर्षे महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा मोठया उत्साहाने पार पडत आहेत. या स्पर्धेचा इतिहास समाजापर्यंत पोहोचविणे. सुरुवातीला १९६० ते १९७० चे दशक व आज होणा-या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा यामध्ये झालेला बदल समाजापर्यंत, कुस्तीगिरांपर्यंत पोहोचविणे. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेतून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी होण्यासाठी या स्पर्धेचा कसा उपयोग होतो याबद्दल माहिती या पेपरच्या माध्यमातून पैलवानापर्यंत समाजापर्यंत पोहोचविणे. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेने महाराष्ट्राच्या कुस्ती क्षेत्राला काय दिले याचा शोध घेणे. गेल्या ६० वर्षामध्ये या स्पर्धेमध्ये काही महत्वाचे बदल ठळक घडामोडी घडल्या त्या समाजापुढे आणणे. याबद्दल माहिती या शोधनिबंधामध्ये दिली आहे. दिनांक ४ एप्रिल, १९५३ साली महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषदेचे पहिले अधिवेशन पुणे येथे झाले व डिसेंबर २०१४ मध्ये ५८ वे अधिवेशन अहमदनगर येथे झाले. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत एकूण ४४ तालीम संघातून ६१६ खेळाडू स्पर्धेत सहभागी होतात. महाराष्ट्र केसरी किताबाची लढत ही ८४ किलो ते १२० किलोपर्यंत वजन असणा-या कुस्तीगिरांमध्ये होते. सर्व कुस्तीगिर हे सर्व जिल्हयाचे व महानगरपालिकेचे प्रतिनिधीत्व करतात. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी १ मातीचा व २ मॅटचे आखाडे असतात. महाराष्ट्र केसरीची अंतीम लढत ही महाराष्ट्र केसरी गट मातीवरील विजेता व गादीवरील विजेता यांच्यामध्ये अंतीम लढत होऊन विजेत्या कुस्तीगिरास महाराष्ट्र केसरी किताब दिला जातो.

***प्रस्तावना–***

१९४० च्या दशकामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये मैदानावरील हुल्लडबाजीमुळे, दंगलीमुळे सामान्य जनतेचे कुस्ती या खेळाबद्दल वाईट मत झाले होते. अनिष्ट प्रथेमुळे १९४० च्या दशकात कुस्ती खेळाला ओहोटी लागून उदासिनतेचे वातावरण निर्माण झाले होते. यावर उपाय म्हणून खेळाडूंमध्ये कुस्ती शौकिनांमध्ये दिलजमाई, आत्मीयता व खिलाडूवृत्ती निर्माण करण्यासाठी १९४७ साली पुण्यामध्ये पुणे राष्ट्रीय तालीम संघाची स्थापना झाली.

संघटना बांधली गेल्यामुळे मैदानातील कुस्त्या शांत वातावरणात पार पडू लागल्या. त्यामुळे महाराष्ट्रातील इतर जिल्हयामध्ये देखील अशाच प्रकारचे तालीम संघ असावे असे वाटू लागले. त्याकरिता महाराष्ट्रातील मल्लविद्योतील जाणत्या मंडळीची एक परिषद भरवावी असे ठरले.

**राज्य कुस्तिगीर परिषदेचा उगम :-**

कुस्तीच्या वेळी दोन गटांमधील होणारी भांडणे व त्या भांडणांचा अधिकारवाणीने निकाल देणारी यंत्रणा राज्य कुस्तीगिर परिषदेच्या माध्यमातून निर्माण करावयाची होती. तसेच बलवान, निकोप, देशप्रेम असणारी तरुणपिढी निर्माण करणे या सर्व गोष्टींचा विचार करुन २ ते ४ ऑक्टोंबर, १९५३ रोजी पुणे येथे महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषदेचे पहिले अधिवेशन घेऊन महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषदेची स्थापना करण्यात आली.

**परिषदेचे संस्थापक कार्यकारी मंडळ :-**

मामासाहेब मोहोळ यांच्या अथक प्रयत्नातून १९५३ साली स्थापन झालेल्या राज्य कुस्तीगिर परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यावेळचे मुंबई राज्याचे महसूलमंत्री ना.भाऊसाहेब हिरे यांची निवड झाली. उपाध्यक्ष पदी श्री.सयाजीराव सीलम यांची निवड झाली, कार्याध्यक्ष म्हणून आमदार मामासाहेब मोहोळ यांची निवड झाली. कार्यकारी मंडळामध्ये चिटणीस श्री.आर.डी.पवार, पुणे, सहचिटणीस श्री.आर.डी.गांधी, धुळे व वि.स.उत्तरकर, सोलापूर, खजिनदार श्री.बापूसाहेब पठारे, पुणे याशिवाय प्रत्येक जिल्हयातून २-२ प्रतिनिधी अशी कार्यकारिणी तयार झाली. अशाप्रकारे ३ दिवसाच्या या अधिवेशनामध्ये तीनशे ते चारशे पैलवानांच्या कुस्त्या झाल्या.

**सध्याची कार्यकारिणी रचना :-**

मा.शरदचंद्र पवार, अध्यक्ष, मा.श्रीपती खंचनाळे- प्रमुख आश्रयदाते, कार्याध्यक्ष- मा.दादु चौगुले, वरिष्ठ उपाध्यक्ष- नामदेवराव मोहिते, याशिवाय ८ उपाध्यक्ष, ८ विभागीय सचिव, ३ संघटक, तांत्रिक चिटणीस- श्री.विलास कथुरे या सर्वांना बरोबर घेऊन गेली अनेक वर्षे मा.श्री.बाळासाहेब लांडगे, सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषद हे महाराष्ट्र केसरी स्पर्धा यशस्वीपणे पार पाडित आहेत व महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषदेचा कारभार समर्थपणे सांभाळत आहेत.

**महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषदेची अधिवेशने :-**

१९५३ पासून २०१४ पर्यंत महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषदेची एकूण ५८ अधिवेशने झाली. सुरुवातीच्या काळामध्ये १९५३ ते १९६० पर्यंत महाराष्ट्र राज्य, कुस्तीगिर परिषदेच्या अधिवेशनाच्यावेळी कुस्तीगिरांची मैदाने होत. म्हणजेच सुरुवातीला कुस्त्या हया जोड ठरवून लावल्या जात असत. १९६१ पासून महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा हया वजनगटानुसार खेळविल्या जातात.

**महाराष्ट्र केसरी निवड :-**

१९५५ च्या मुंबई अधिवेशनामध्ये महाराष्ट्रातील अजिंक्य मल्ल ठरविण्यासाठी एक योजना करण्यात आली. त्या योजनेनुसार विजयी पैलवानाला महाराष्ट्र केसरी ही पदवी व मानचिन्ह म्हणून चांदीची गदा देण्याचे ठरले. १९५८ च्या सोलापूर अधिवेशनामध्ये संघटनेच्या शाखांची तालुकानिहाय स्थापना करुन जिल्हा निवड चाचणी घेऊन मगच महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी जिल्हयाचा संघ पाठवावा असे ठरविण्यात आले. १९५९ साली महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषद ही इंडियन स्टाईल रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडिया या भारतीय संस्थेशी संलग्न करण्यात आली. तसेच महाराष्ट्र केसरी स्पर्धा या वजनगटानुसार आठ वजनगटामध्ये घेण्याचे ठरले. तसेच स्पर्धा हया तालुका, जिल्हा व राज्य अधिवेशन अशा पध्दतीने घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे १९६० च्या अधिवेशनामध्ये २० जिल्हयातून ३८ संघ नागपूर अधिवेशनामध्ये सहभागी झाले होते.

**पहिले महाराष्ट्र केसरी :-**

१९६१ साली नागपूर येथे झालेल्या या अधिवेशनामध्ये ऑलिंपीक नियमानुसार महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा या घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये २६ जिल्हयातून २३ संघाचे ५०० चे वर पैलवान सहभागी झाले होते. महाराष्ट्र केसरी किताबाची अंतीम लढत मुंबईचे बिरजू यादव व कोल्हापूरचे दिनकर दहयारी यांच्यामध्ये झाली. या स्पर्धेमध्ये दिनकर दहयारी यांनी बिरजू यादव यास चितपट करुन पहिला महाराष्ट्र केसरी होण्याचा मान मिळविला.

**महाराष्ट्र केसरी स्पर्धेतील ठळक घडामोडी :-**

१९५३ च्या पहिल्या अधिवेशनापासून २०१४ पर्यंत एकुण ५८ अधिवेशने झाली. या ५८ अधिवेशनामध्ये १९६१ ला पहिला महाराष्ट्र केसरी झाला. आजपर्यंत ४८ महाराष्ट्र केसरी झाले. यामध्ये प्रामुख्याने गणपत खेडकर, दादु चौगुले, चंबा मुत्नाळ, लक्ष्मण वडार, चंद्रहार पाटील हे पाचजण प्रत्येकी दोन वेळा महाराष्ट्र केसरी झाले व नरसिंग यादव हे २०११, २०१२, २०१३ असे सलग तीन वेळा महाराष्ट्र केसरी झाले. १९६४ साली अमरावती येथील अधिवेशनात प्रथमच मॅटचा(गादीचा) समावेश करण्यात आला आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषदेने आंतरराष्ट्रीय कुस्ती क्षेत्रात नवे पाऊल टाकले. सन १९६१ ते १९८२ पर्यंत महाराष्ट्र केसरी विजेत्यास महाराष्ट्र शासन चांदीची गदा देत होते. परंतु १९८३ साली पुण्यात झालेल्या २८ व्या राज्य अधिवेशनापासून कुस्तीमहर्षी मामासाहेब मोहोळ यांच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव माजी खासदार श्री.अशोक मोहोळ यांनी महाराष्ट्र केसरी विजेत्यास गदा देण्याची परंपरा सुरु केली. अशा या महाराष्ट्र केसरी स्पर्धेमध्ये ४४ तालीम संघातून ६१६ कुस्तीगिर ४४ तालीम संघातून ८८ मार्गदर्शक व ८८ संघव्यवस्थापक, १०० तांत्रिक अधिकारी पंच, २० नामांकित कुस्तीगिर, भारतीय कुस्ती संघाचे ५ निरीक्षक, महाराष्ट्र ऑलिंपीक संघाचे ५ निरीक्षक असा एकूण १०१० जणांचा या स्पर्धेमध्ये सहभाग असतो. या स्पर्धेसाठी १ मातीचा आखाडा व २ गादीचे आखाडे बनविले जातात. त्यावर या स्पर्धा पार पडल्या जातात. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची अंतीम लढत ही महाराष्ट्र केसरी गट गादीवरील विजेता व महाराष्ट्र केसरी गट मातीवरील विजेता यांच्यामध्ये महाराष्ट्र केसरी किताबाची अंतीम लढत होते. महाराष्ट्र केसरी विजेत्यास चांदीची गदा व १ लाख रुपये इनाम बक्षिस म्हणून दिले जाते.

**आंतरराष्ट्रीय कुस्तीगिर :-**

अशा या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेने महाराष्ट्राला मारुती माने, गणपतराव आंधळकर हे आशियाई सुवर्णपदक व रौप्यपदक विजेते बुवा घुमे, शामराव साबळे कांस्य पदक विजेते हरिश्चंद्र बिराजदार, रघुनाथ पवार, राम-सारंग, आप्पालाल शेख, नरसिंग यादव हे कॉमनवेल्थ सुवर्णपदक विजेते, तसेच दादु चौगुले, शिवाजी चिंगळे हे रौप्यपदक विजेते. अलिकडच्या काळामध्ये राहुल आवारे व नरसिंग यादव यांसारखे आंतरराष्ट्रीय मल्ल महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेतून महाराष्ट्राला मिळाले.

**महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे उद्दिष्ट :-**

आंतरराष्ट्रीय कुस्तीच्या बदलत्या नियमांची माहिती महाराष्ट्रातील मल्लांना करुन देणे तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे पदकविजेते मल्ल तयार करण्याचे कार्य या महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या माध्यमातून होते. अशात-हेने या शोधनिबंधामध्ये गेल्या ६० वर्षाचा महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा प्रवास समाजासमोर आणून महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची वाटचाल सांगितली आहे.

**संदर्भ :-**


१) कृष्णा सूर्यवंशी (१९९८) "भारतीय मल्लविद्या उदय आणि विकास" प्रकाशन महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषद, पुणे.

२) उत्तमराव पाटील (२००२) "फ्री स्टाईल ग्रीकोरोमन पुरुष व महिला आंतरराष्ट्रीय कुस्ती नियम" प्रकाशन, वसंतदादा कुस्तीकेंद्र क्रीडानगर सांगली.

३) संजय दुधाणे (२००३) "आलिंपीकवीर खाशाबा जाधव" ३ री आवृत्ती प्रकाशन, क्रीडामित्र प्रकाशन, पुणे.

४) संजय भोला धीर (२००८) "विविध खेळ आणि नियम" साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

५) प्रा.दिनेश गुंड (२०१३) "आंतरराष्ट्रीय कुस्ती नियम" प्रकाशन, जोग महाराज व्यायामशाळा, आळंदी.






महाराष्ट्र केसरी किताबाची गदा